

# वृद्धाश्रम - काळाची गरज

जीवनामध्ये जन्म आणि मृत्यूचं रहाटगाडगं चालूच असतं. जगातल्या सर्व तत्त्वज्ञानांनी आणि थोर समाजसुधारकांनी म्हटलेलं आहे की, जो जन्माला आला त्याचा मृत्यू अटळ आहे. गीतेमध्ये म्हटलं आहे, ज्याला जन्म आहे, त्याला काही ना काही व्याधी जडणार, त्याला वार्धक्य येणार आणि नंतर त्याला मृत्यू येणार. म्हणजे वृद्धत्व हा जीवनातला एक टप्पा आहे. मनुष्य जन्माला येतो. तेव्हा तो शिशू अवस्थेत असतो. त्यावेळी त्याची पाटी कोरी असते. त्याला भोवतालचं ज्ञान नसतं. हळूहळू आपल्या भोवतीच्या निसर्गातून, आपल्या निरीक्षणातून, आई-वडील, आजी-आजोबा यांनी केलेल्या संस्कारातून त्याची जडणघडण सुरू होते. लहानपणात त्याचं शरीर, त्याची बुद्धी विकसित होऊ लागते. शाळेत जाऊन, शिक्षकांच्या मार्गदर्शनातून, पुस्तकांच्या वाचनातून त्याला ज्ञान मिळू लागतं. वेगवेगळ्या विद्यांमध्ये तो पारंगत होतो. नंतर तो तारुण्यात प्रवेश करतो. आपल्या ज्ञानाच्या, शक्तीच्या बळावर तो अर्थार्जन करू लागतो. त्याचा विवाह होतो, त्याला अपत्यं होतात, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या हितासाठी तो काम करू लागतो. हळूहळू तो वृद्धावस्थेकडे जातो. त्याची ताकद कमी होऊ लागते, त्याची स्मरणशक्ती क्षीण होऊन लागते आणि एके दिवशी त्याचा मृत्यू होतो. त्याची पाटी कोरी होते. जन्मापासून मरेपर्यंत माणूस असा वेगवेगळ्या टप्प्यांमधून जातो. त्यामुळे लहानपणात, तरुणपणात तुम्ही स्वप्नं जरूर पाहा; डॉक्टर होण्याचं, इंजिनियर होण्याचं, भरपूर यशस्वी होण्याचं, भरपूर कीर्ती

मिळवण्याचं, स्वप्न कोणतंही असो ते जरूर पूर्ण करा; पण हे कधीही विसरू नका की, कधी तरी तुम्ही वृद्ध होणार आहात आणि कधीतरी या जगाचा निरोप घेणार आहात.

महाभारतात यक्ष युधिष्ठिराला प्रश्न विचारतो की, माणूस सतत काय विसरतो? युधिष्ठिराने उत्तर दिलं होतं, ''माणूस आपल्या मृत्यूला विसरतो?'' वास्तविक, मृत्यू अटळ आहे, वृद्धत्व अटळ आहे. शरीराची झीज होणं, ताकद कमी होणं अटळ आहे. विचार करण्याची शक्ती क्षीण होणं अटळ आहे. समाजाच्या लोकसंख्येमध्ये वृद्ध मोठ्या संख्येने असणं स्वाभाविक आहे. समाजात लहान मुलांच्या जडण-घडणीसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी शाळा असतात. मला वाटतं, समाजात वृद्धांसाठी सुद्धा अशाच एका प्रकारच्या शाळेची गरज असते. वृद्धांची विचार करण्याची क्षमता तरुणांच्या विचार करण्याच्या क्षमतेपेक्षा वेगळी असते. त्यांचे विचार त्याचबरोबर आचार वेगळे वेगळे असतात. तरुण रस्त्यावरून झपझप चालू शकतो, पण वृद्धाची चाल मंदावलेली असते. रस्त्यात एखादा अडथळा असेल तर तरुण उडी मारून तो पार करू शकेल, पण वृद्धाला मात्र ते जमणार नाही. त्याने तसा प्रयत्न केलाच तर अपघात घडू शकतो व त्याला शारीरिक इजा होऊ शकते. तरुण आणि वृद्ध या दोन अवस्था आहेत. या दोन अवस्थांमधील क्रिया-प्रतिक्रिया वेगवेगळ्या असतात. याचं कारण आधी म्हटल्याप्रमाणे, वृद्धत्वाबरोबर शारीरिक-मानसिक शक्तीमध्ये होणारी घट हे आहे. तरुणाचा आहार भरपूर असेल, दिवसांत दोन वेळा तो भरपूर जेवणं करू शकेल, मात्र वृद्धाचा आहार अल्प असेल, एकावेळी तो जास्त खाऊ शकणार नाही, दिवसातून तीन-चार वेळा तो थोडं थोडं खाईल. थोडक्यात, वृद्धत्वामध्ये आचार, आहार, विहार अशा सगळ्याच गोष्टींमध्ये बदल घडतो. त्यामुळे या वृद्धत्वाला सामोरे जाण्यासाठी त्यांच्याकरिता एक प्रकारची शाळा पाहिजे, असं मला वाटतं. ही शाळा म्हणजे वृद्धाश्रम.

तारुण्य आणि वृद्धत्व या दोन अवस्था आहेत, असं आधी मी म्हटलं आहे. या दोन वृत्ती आहेत. त्यांच्यामध्ये खूप फरक आहे. एक व्यक्ती तरुण असते तेव्हा तिचा आहार, विहार, आचार जसा असतो, तसा ती वृद्ध होते तेव्हा राहात नाही. त्यात फरक पडतो. तारुण्यात स्वावलंबी असलेली व्यक्ती वृद्धत्वात परावलंबी बनते. हे परावलंबन कदाचित पैशाचं नसेलही, आजकाल आपल्या वृद्धत्वासाठी आर्थिक तरतूद काही ना काही प्रमाणात आपल्या क्रियाशील आयुष्यात लोक करून ठेवत असतात, प्रॉव्हिडंड फंड, पेन्शन, आयुर्विमा, दीर्घ मुदतीच्या ठेवी किंवा इतर प्रकारच्या

गुंतवणुकीद्वारे, तरीही शारीरिक मानसिक मदतीसाठी कोणावर तरी अवलंबून राहण्याची वेळ अनेकांवर येत असते. मात्र, आज जीवन खूप गतिमान झालं आहे. धावपळीचं झालं आहे, त्यामुळे आजची पिढी खूप प्रॅक्टिकल झाली आहे. रोजची जगण्याची धावाधाव करताना, त्याच्या कुटुंबाच्या गरजा भागवताना मुलांना त्यांचे आई-बाप गळ्यातल्या लोढण्यासारखे वाटू लागले आहेत, हे समाजातल्या अनेक कुटुंबामधलं चित्र आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात वृद्ध ही अडगळीची वस्तू बनली आहे. या करिता आजच्या तरुणपिढीला दोष देणंही योग्य नाही, कारण त्यांनी त्यांच्या कामधंद्यांसाठी वेळ द्यायचा की घरातल्या वृद्धांच्या गरजांकडे? यात त्यांची ओढाताण होते. वृद्धांनाही आपल्यामुळे कुटुंबाला त्रास होत असल्याची जाणीव होते व त्यांच्या मनालाही टोचणी लागून राहते. अपण ओझे बनल्याची भावना त्यांना खात राहते. समाजात आज ही समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे आणि ती सोडवण्यासाठी समाजाने काहीतरी करणं आवश्यक आहे. वृद्धाश्रम हा यावरचा चांगला उपाय आहे. तो समाजाने स्वीकारला पाहिजे. एखाद्या मुलाने आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवलं, म्हणजे तो कृतघ्न निघाला, जन्मदात्या आई-वडिलांची त्याला कदर नाही इथपासून ते आजकालच्या सुनांना सासू-सासरे घरात नकोच असतात, ते सुद्धा कधीतरी म्हातारे होणारच आहेत तेव्हा देव त्यांना पाहून घेईल इथपर्यंत लोक जी टिकाटिप्पणी करतात. तो खूप नकारात्मक प्रकार आहे. त्यामुळे वृद्धाश्रमाबद्दल जनमानसात अपराधीपणाची भावना तयार झाली आहे, हे सर्वथा अयोग्य आहे. त्यामुळे वृद्धाश्रम हा 'दुःखाश्रमं' न वाटता 'आनंदाश्रम' वाटला पाहिजे, असं वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. ही आजच्या काळाची गरज आहे.



आज मुंबई-पुण्यासारख्या किंवा कोणत्याही मोठ्या शहरांत वृद्धांच्या जगण्याला पोषक वातावरण राहिलेलं नाही. कधी काळी पुण्याला 'पेन्शनरांच शहर' म्हटलं जात होतं. त्यावेळी पुण्याची लोकसंख्या आजच्या एवढी फुगलेली नव्हती,

आजच्या एवढी वाहनं त्यावेळी पुण्याच्या रस्त्यांवर नव्हती; त्यामुळे आजच्या एवढं प्रदूषण नव्हतं. रस्ते वाढवण्यासाठी, घरं बांधण्यासाठी तेव्हा झाडं तोडली जात नव्हती, त्यामुळे शहरात खूप झाडं होती, तिन्ही ऋतुंमध्ये शहराचं हवामान मध्यम असायचं. खूप तीव्र उन्हाळा नाही, मोठे पूर यावेत इतका पाऊस नाही आणि कडाका पडावा एवढी थंडी नाही. तेव्हा शरीराला पोषक असं हवामान शहरात होतं. शहर शांत होतं, तुलनेने खूप स्वच्छ होतं. सकाळी आणि संध्याकाळी शहरात प्रसन्न वातावरण असायचं, शहरात ज्ञानी, विचारवंत, कलावंत, साहित्यिक अशा मंडळींची संख्या जास्त असल्याने सांस्कृतिक वातावरण जिवंत होतं. त्यामुळे निवृत्तीनंतर पुण्यात घर घेऊन राहायचं हे स्वप्न अनेकजण पाहायचे व पुण्यात येऊन राहायचे. म्हणून 'पेन्शनरांचं शहर' असं पुण्याच्या बाबतीत म्हटलं गेलं. आज पुण्यात पुष्कळ पेन्शनर असले आणि वेगवेगळ्या कारणांनी अनेकजण पुण्यात येऊन राहात असले तरी तेव्हाचं वातावरण आत्ता अजिबात राहिलेलं नाही. आज पुण्यात वृद्धांचं जीणं खूप मुश्किल झालं आहे. तसंच ते इतर शहरांमध्येही झालं आहे.

शहरांमध्ये सीटी बसेस, लोकल रेल्वे जलद गतीने धावू लागल्या आहेत. मेट्रो रेल्वे, मोनोरेल हे वाहतुकीचे जलद प्रकार येऊ घातले आहेत. त्यांच्या गतीशी जुळवून घेणं वृद्धांसाठी कठीण बनलं आहे. मुंबईत लोकल गाड्या खचाखच माणसे भरून धावतात. अर्ध्या मिनिटांपेक्षाही कमी वेळ स्टेशनवर थांबतात. वृद्ध स्त्री-पुरुष गर्दीतून वाट काढत डब्यापर्यंत पोहचू शकत नाहीत आणि पोहोचले तरी डब्यात शिरू शकत नाहीत. रस्त्यावर वाहनांची इतकी वर्दळ असते की वृद्धांना रस्ता ओलांडणे अशक्य होते. त्यामुळे कोणाच्या मदतीशिवाय ते शहरात प्रवास करू शकत नाहीत, फिरू शकत नाहीत. हीच गोष्ट अन्नाच्याबाबतीतही होते. आजच्या गतिमान आयुष्यात 'फास्ट फूड'ला (नाहक!) महत्त्व आलं आहे. भूक लागली वडापाव खा, भेळ-पाणीपुरी खा, हॉटेलातून पार्सल घरी मागवा नाहीतर पिझ्झासाठी ऑर्डर द्या; कारण स्वयंपाक करायला वेळ नाही. तरुण वयात त्यांनीही असं 'जंक फूड' पचवलं असेल पण म्हातारपणी ते अवघड आहे. त्यामुळे त्यांचे हाल होऊ शकतात. याशिवाय हवेतील प्रदूषण, रस्त्यावरचा गोंगाट, दूषित पाणी यांचा होणारा त्रास म्हणूनच शहरांमध्ये वृद्धांना आराम मिळणं कठीण झालं आहे; पण या वयात कुठल्या ना कुठल्या व्याधीचं शेपूट मागे लागलेलं असतं. व्याधीने रुद्रावतार धारण करण्यास सुरुवात केलेली असते. या स्थितीत वृद्धांना स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, भरपूर प्रकाश आणि शांतता हवी असते. हे



सारं आता शहरांमध्ये अवघड झालं आहे आणि मिळालं तरी त्यासाठी खूप पैसे मोजावे लागू शकतात. यावर उत्तम मार्ग म्हणजे वृद्धांनी खेड्यामध्ये जायला पाहिजे.

व्यक्तीला आपल्या गावाची ओढ असते. रोजीरोटीसाठी आपलं गाव सोडून माणसं शहरात येतात. कामाच्या व्यापात गुंतून पडतात. पण आपलं गाव, आपलं घर त्यांच्या मनात असतं. निवृत्तीनंतर आपल्या मूळ गावी परतण्याची त्यांची इच्छा असते. काहीजण दुसऱ्या प्रांतातून, परदेशातून स्थलांतर करतात, त्यांना आपल्या प्रांताची, परदेशाची ओढ असते. तिकडे परतण्याची त्यांची इच्छा असते. अर्थात, असेही अनेकजण असतात की त्यांचं गावात घर वगैरे काही नसतं किंवा घर असूनही त्यांची देखभाल करण्यासाठी कोणी नसतं, किंवा असेही अनेकजण असतात जे मूळचे शहरातीलच असतात पण चांगल्या आरोग्यासाठी आणि मनःस्वास्थ्यासाठी एखाद्या गावात जाऊन राहण्याची त्यांची इच्छा असते. या साऱ्यांची गरज लक्षात घेऊन वृद्धाश्रमाची उभारणी छोट्या छोट्या गावांमध्ये, निसर्गाच्या सान्निध्यात केली पाहिजे असं मला वाटतं. ज्या लोकांची गावात घरं आहेत, काळजी घेणारी माणसं आहेत, ती आपल्या घरात राहतील. इतर वृद्ध वृद्धाश्रमात राहतील. अवतीभोवती समवयस्क वृद्ध असल्याने त्यांच्या विचारांत फारसं अंतर असणार नाही, आवडीनिवडी फारशा वेगळ्या असणार नाहीत. एकमेकांच्या सान्निध्यात उत्तरायुष्यातला आनंद ते घेऊ शकतील. मानसिक समाधान मिळवू शकतील. एकमेकांच्या आजारात एकमेकांची सेवा-शुश्रूषा करतील. त्यांच्या शारीरिक-मानसिक गरजा योग्य प्रकारे पूर्ण करू शकतील.

खेड्यांमध्ये वृद्धाश्रम उभारण्याचे व तिथे वृद्धांच्या स्थलांतराचे समाजाला काय फायदे संभवतात? एक म्हणजे, खेड्यांमधील पैशाचं चलनवलन वाढू शकतं. वृद्ध खेड्यांकडे येताना त्यांच्याबरोबर त्यांचा पैसाही खेड्यांमध्ये येईल. कुणाला पेन्शन मिळत असेल, कोणी निवृत्तीनंतर मिळालेले पैसे ठेवींमध्ये गुंतवलेले असतील. त्यावरचं व्याज त्यांना मिळत असेल, कोणाची मुलं त्यांना खर्चासाठी पैसे देत असेल. या पैशांचा उपयोग खेड्यात रोजगार निर्माण करण्यासाठी होऊ शकतो. वृद्धांची सेवा

करणं असेल, त्यांच्यासाठी जेवण बनवणं असेल, वृद्धाश्रमाची स्वच्छता - साफसफाई असेल, सुरक्षा असेल, वृद्धांना फेरफटका मारण्यासाठी वाहन असेल, या वाहनांची देखभाल-दुरुस्ती असेल, त्याला लागणारं इंधन असेल, वृद्धांना कपडे शिवायचे असतील, त्यांच्या कपड्यांची धुलाई असेल, त्यांचे दाढी-केस कापणं असेल, त्यांची पादत्राणं असतील, त्यांची दुरुस्ती असेल अशी कितीतरी कामं ही ग्रामीण भागातल्या उपजीविकेचं साधन नसलेल्या तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करू शकतील.

खेड्यांमध्ये रोजगार नाहीत म्हणून खेड्यांतले लोक शहरांकडे जातात, पण असे सर्वचजण जात नाहीत. अनेकजण इच्छा असूनही जाऊ शकत नाहीत; कारण त्यांच्याकडे शहरात रोजगार मिळवण्यासाठी आवश्यक शिक्षण कौशल्य नसतं किंवा आणखी कोणतीही कारणं असू शकतात. अशा तरुणांना, प्रौढांना आणि स्त्रियांना खेड्यातच अशाप्रकारे पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ रोजगार उपलब्ध होतील. विशेषत: स्त्रियांना ज्यांना रोजगाराच्या फारच थोड्या संधी असतात. त्यांना वृद्धांची सेवा शुश्रूषा, स्वयंपाक, स्वच्छता वृद्धाश्रमाचे व्यवस्थापन अशी कामे मिळू शकतील. त्यांच्याही हातात थोडेफार पैसे खेळू लागतील. त्यांचा कुटुंबाला आर्थिक हातभार लागेल. त्या थोडीफार बचत करू शकतील. मुलांच्या भावी आयुष्याची थोडीफार तरतूद करू शकतील. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यास त्यामुळे मदत होईल.

खेड्यांमध्ये वृद्धाश्रमात राहणारे वृद्धही आपला वेळ समाजाच्या उपयोगासाठी खर्च करू शकतील. निवृत्त आयुष्य जगणाऱ्या या वृद्धांकडे जो मोकळा वेळ आहे. तो सत्कारणी लागू शकेल व त्यांनाही समाधान मिळू शकेल. हे वृद्ध खेड्यातल्या मुलांना शिकवण्याची जबाबदारी घेऊ शकतील. मुलांवर चांगले संस्कार करू शकतील. त्यांना त्यांचे आयुष्यातले अनुभव सांगू शकतील. थोरा-मोठ्यांच्या गोष्टी सांगून मुलांना-तरुणांना योग्य मार्ग दाखवू शकतील. शहरांमध्ये दीर्घकाळ कोणत्या ना कोणत्या पदावर काम करून निवृत्ती घेतलेले अनुभवसंपन्न असे हे वृद्ध असतील. त्यांच्या अनुभवाचा-ज्ञानाचा लाभ गावांना मिळू शकेल. गावातील काही समस्या असतील तर त्यांचा सल्ला गावकऱ्यांना उपयोगाचा ठरू शकेल. पाण्याची समस्या असेल, विजेची समस्या असेल, शेतीची समस्या असेल, या समस्यांबद्दल वृद्ध गावकऱ्यांना मार्गदर्शन करू शकतील. वृक्षरोपणासारखे छोटे-छोटे उपक्रम ते गावकऱ्यांच्या साथीने गावात राबवू शकतील. हलक्या स्वरूपाची छोटी-छोटी कामं हे वृद्ध करू शकतील. त्यामुळे त्यांचा वेळ चांगला जाऊ शकेल ते गावाच्या विकासासाठी आपली ऊर्जा खर्च करू

शकतील. त्यामुळे आपण आपला वेळ सत्कारणी लावण्याचं समाधान त्यांना मिळू शकेल. खेडेगावात राहणाऱ्या वृद्धांनाही या वृद्धश्रमाचे लाभ मिळू शकले पाहिजेत. त्यांनी वृद्धाश्रमातच राहिलं पाहिजे, अशी अट असू नये. वृद्धाश्रम या वृद्धांची किमान एकवेळच्या जेवणाची सोय करू शकेल. वृद्धापकाळात माणसाला काही फार मोठा आहार लागत नाही. त्यामुळे सर्वांचीच सोय होऊ शकते. गावातले वृद्ध वृद्धाश्रमातल्या वृद्धांना भेटू शकतील. त्यांच्याशी गप्पा मारू शकतील. सगळे मिळून विरंगुळ्याचे क्षण उपभोगू शकतील.

वृद्धापकाळात व्यक्तीची अन्नाची गरज कमी होते. पण तिला स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. शहरांमध्ये जे वृद्ध फ्लॅटमध्ये राहतात त्यांना सकाळी सूर्याची कोवळी किरणं मिळण्याची शक्यता कमीच असते. दाटीदाटीने उभ्या राहिलेल्या इमारतीमध्ये वृद्धांना स्वच्छ हवा मिळणं मुश्किल असतं आणि त्यांना शुद्ध पाणी मिळेल याची हमी कोणीच देऊ शकत नाही. वृद्धांना शहरांमध्ये अगदी कोंडल्यासारखं राहावं लागतं. त्यांना डी-१, २ सारखी जीवनाला आवश्यक जीवनसत्त्वं पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत त्यामुळे त्यांची हाडं ठिसूळ होऊ शकतात, त्यांना अस्थींचे वेगवेगळे विकार जडू शकतात. हवेच्या अशुद्धतेमुळे श्वासांचे, छातीचे विकार होऊ शकतात. पाण्याच्या अशुद्धतेमुळे पोटाचे वेगवेगळे विकार होऊ शकतात आणि त्यांचं जीवनमान घटू शकतं. गावांमध्ये वृद्धांना बऱ्यापैकी शुद्ध हवा, पाणी आणि भरपूर सूर्यप्रकाश मिळू शकतो. त्यामुळे त्यांचं आरोग्य चांगलं राहू शकेल. त्यांना काही व्याधी असतील तर त्या दूर होऊ शकतील किंवा किमान त्या नियंत्रणात राहू शकतील आणि ते दीर्घायुष्य जगू शकतील.

वृद्धाश्रमातील वृद्धांच्या आरोग्याकरिता वृद्धाश्रमात एखादा दवाखाना सुरू करता येतील. वैद्यकाच्या वेगवेगळ्या शाखेतील तज्ज्ञ मंडळींना तिथे अधूनमधून बोलवता येतील. हे तज्ज्ञसुद्धा सेवाभावी वृत्तीने तिथे येऊन वृद्धांची तपासणी करतील, त्यांच्यावर उपचार करतील. या दवाखान्यात औषधांची सुविधा असेल. सरकार किंवा समाजातील दानशूर व्यक्ती यासाठी वृद्धाश्रमांना मदत करतील. अशाप्रकारे वैद्यकीय सेवेची चांगल्या प्रकारे बांधणी त्या ठिकाणी करता येईल. एखाद्या वृद्धाला तातडीची वैद्यकीय सेवेची गरज असल्यास त्याला जवळच्या मोठ्या रुग्णालयात नेण्यासाठी ॲम्ब्युलन्सची व्यवस्था तिथे असेल. प्रथमोपचारासाठी सर्व साधनं या दवाखान्यात असतील तसेच पूर्णवेळ प्रशिक्षित डॉक्टर, नर्स व आरोग्यसेवक तिथे उपलब्ध असतील. या सुविधेमुळे शहरात राहणाऱ्या या वृद्धांच्या मुलांची त्यांच्या आरोग्याबद्दलची चिंता

कमी होईल. ते स्वस्थ चित्ताने आपल्या स्वत:च्या कामांमध्ये लक्ष घालू शकतील. वृद्धाश्रमातील या वैद्यकीय सुविधेचा लाभ गावातील आबालवृद्धांना उपलब्ध केला, तर गावातील लोकांची खूप चांगली सोय होऊ शकेल. वैद्यकीय सेवेच्या अभावी कोणी व्यक्ती आजारी पडल्यास तिला तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या गावी न्यावं लागते. ॲम्ब्युलन्सची सोय गावात नसते. एखादी व्यक्ती गंभीर अवस्थेत असेल तर जवळच्या इस्पितळात पोहचण्याआधीच अर्ध्या रस्त्यातच तिचा मृत्यू होऊ शकतो. वृद्धाश्रमातील वैद्यकीय सेवेमुळे हे टाळता येतील व गावातील अनेक जीव वाचतील.

वृद्धाश्रमात एखाद्या वृद्धाचं देहावसान झालं, तर गावाच्या परिसरातच त्याच्या पार्थिवावर विधिवत अंत्यसंस्कार करता येतील. यासाठी त्याच्या आप्तस्वकीयांना निरोप देऊन बोलवता येईल. त्यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार पार पडतील. शहरांमध्ये एखाद्या व्यक्तीच्या अंत्यसंस्काराला चार माणसं जमणं देखील आजकाल मुश्कील होत चाललं आहे; कारण प्रत्येकाच्या मागे काम लागलेलं आहे. अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी सुद्धा वेळ नाही अशी अवस्था आहे. इथे वृद्धाश्रमात मात्र इतर वृद्ध असतील, ते एकत्र येऊन मृतात्म्याला सद्‌गती मिळावी यासाठी प्रार्थना करतील. तेजग्यान फाउंडेशनचे 'हॅपी थॉट'चे प्रणेते तेजगुरू 'सरश्री' यांनी 'मृत्युपश्चात जीवन' या त्यांच्या पुस्तकात लिहिलं आहे की, शेवटी तुम्ही जाताना किती लोक तुमच्यासाठी प्रार्थना करत आहेत, यावर तुमचं पुढचं जीवन अवलंबून असतं. माणसाचा मृत्यू झाला तरी त्याचं जीवन संपत नाही. त्यानंतरही ते सुरूच असतं. त्यांना खऱ्या अर्थाने सद्‌गती प्राप्त होऊ शकेल.

असे वृद्धाश्रम स्थापन करण्यात शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. शासनाचं हे कर्तव्यच आहे. मात्र, हे वृद्धाश्रम स्थापन करताना त्यांनी केवळ एक-दोन ठिकाणी खूप मोठे, जिथे हजारोंच्या संख्येने वृद्धांना राहता येईल असे वृद्धाश्रम उभारू नयेत. कारण तसं केल्याने वृद्धाश्रमाचे अपेक्षित लाभ मिळू शकणार नाहीत. असे मोठे वृद्धाश्रम एक प्रकारचे कोंडवाडे बनतील, जिथे वृद्धांचं जीवन आणखीनच कठीण होईल. त्या ऐवजी खेड्यापाड्यांमध्ये छोटे छोटे वृद्धाश्रम उभे करावेत जिथे पंधरा-वीस वृद्ध आनंदात राहू शकतील. त्यामुळे वृद्धाश्रमाचं केंद्रीकरण न होता विकेंद्रीकरण होईल. आज शहरांमध्ये सगळ्या गोष्टी केंद्रित झाल्यामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. एका ठिकाणी प्रचंड प्रकाश आणि बाकी सर्व ठिकाणी प्रचंड अंधार अशी विषमता दिसून येते. ही विषमता संपवून समतोल निर्माण करण्यासाठी विकेंद्रीकरण आवश्यक आहे. एका छोट्या खेड्यात एक वृद्धाश्रम रोजगार निर्मितीचं केंद्र कसं बनू शकतो हे आपण

आतापर्यंतच्या विवेचनात पाहिलंच आहे.

छोट्या छोट्या गावांमध्ये वृद्धाश्रम स्थापन केल्यामुळे गावातून शहरात नोकरीधंद्यासाठी शहरात गेलेले लोक उतारवयात गावाकडे परतू शकतील. त्यामुळे शहरावरचा लोकसंख्येचा ताण काही प्रमाणात का होईना कमी होऊ शकेल. आज शहरांमध्ये धकाधकीच्या जीवनात वृद्ध मंडळी किडा-मुंग्यांसारखे रगडले जात आहेत. रस्त्यांवरून सुरक्षित चालता येईल याचा भरवसा राहिलेला नाही. माझ्या परिचयातले एक गृहस्थ होते. रस्त्यावरून चालत असताना त्यांना एका वाहनाने धडक दिली, त्यांना इस्पितळात दाखलं करावं लागलं. अशा अनेक बातम्या आपण रोज वर्तमानपत्रातून वाचतो. वृद्ध स्त्रियांच्या गळ्यातले मंगळसूत्र, दागिने रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कूटरवरील चोर शिताफीने हिसकावून नेतो. कोणी वृद्ध स्त्रीला रस्त्यात अडवून काही ना काही बहाणे करून त्यांच्या बोटातली अंगठी, हाततल्या सोन्याच्या बांगड्या काढून घेतो. ज्यांनी आयुष्यभर कष्ट केले, खस्ता खाल्ल्या त्यांच रक्षणं करता येत नाही, ही समाजाकरिता नामुष्कीची गोष्ट आहे. शहरी समाज आत्मकेंद्री, संकुचित बनत चालल्याचा हा परिणाम आहे.

दुधाच्या क्षेत्रात डॉ. वर्गीस कुरियन यांनी 'अमूल'चा प्रयोग यशस्वी केला तो संघशक्तीतून, गुजरातमधील आणंद येथील शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी दूध संघ स्थापन केला. या संघाला यश मिळाल्यानंतर गुजरातमध्ये ठिकठिकाणी संघ स्थापन झाले आणि सारे 'अमूल'च्या छताखाली एकत्र झाले. सहकारातील ही क्रांती आपल्या सगळ्यांना माहीत आहे. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या गुरांना डॉक्टरकडे नेण्यापेक्षा कुरियन यांनी जनावरांसाठी पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध केली तिचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळू लागला. ही 'सर्वांच्या हिताची' 'कॉमन गूड'ची संकल्पना वृद्धाश्रमांच्या बाबतीतही राबवता येईल. वृद्धांना लागणाऱ्या सर्व सेवांचं अशाप्रकारे नियोजन करता येईल व त्या सर्वांची पूर्तता करता येईल. या सेवांचा लाभ वृद्धाश्रमातील वृद्धांप्रमाणेच गावातल्या सर्व लोकांना मिळेल, अशीही व्यवस्था करता येईल व त्यातून गावाचे हीत साधले जाईल. विकेंद्रीकरणाचं एक रूप म्हणून या संकल्पनेमध्ये पाहता येईल. वृद्धाश्रमाच्या रूपाने अर्थकारणाचं विकेंद्रीकरण होईल, माणसाचंही विकेंद्रीकरण होईल. गावातल्या लोकांना रोजगार मिळतील. अन्न-वस्त्र-निवाऱ्याची सोय होईल. शहरांवरचा ताण कमी होईल शहर आणि खेडी यांच्यात संतुलन साधण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे पडेल. हे सर्व लाभ पाहता वृद्धाश्रम ही काळाची गरज आहे, असंच म्हणावं लागेल !